ePaper

‖ वर्ष - 7 ।अंक - 352 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 23 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## यशोमती ठाकूर आणि चंद्रकांत पाटलांमध्ये बाचाबाची!



### इंद्रायणी नदी पुन्हा फेसाळली

# पवित्र इंद्रायणीचा ‘आक्रोश’!

## प्रदूषणाचा विळखा कायम: आषाढी वारी पालखी सोहळा तोंडावर!

**।पिंपरी ।महाईन्यूज**

**संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारीचा पायी पालखी सोहळा आठ दिवसांवर येऊन ठेपला आहे. मात्र, आळंदीतील इंद्रायणी नदी पुन्हा फेसाळली आहे. त्याकडे पीएमआरडीए आणि चाकण एमआयडीसी, महापालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दुर्लक्ष होत आहे.**



इंद्रायणी नदीच्या काठावर आळंदी, देहू, तुळापूर अशी प्रमुख तीर्थक्षेत्रे आहेत. तेथे लाखो वारकरी येत असतात. इंद्रायणीस्नान, नगरप्रदक्षिणा, माउलींचे दर्शन असा वारकऱ्यांचा अलिखित नियम आहे. गेल्या वर्षभरात इंद्रायणी नदी अनेकदा फेसाळली आहे. शनिवारी सकाळी पुन्हा फेस आला. आषाढी वारीचा सोहळा आठ – दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यासाठी राज्यभरातून देहू आणि आळंदीमध्ये लोखो वारकरी येणार आहेत. वारकरी हे इंद्रायणी नदीमध्येच स्नान करतात. या फेसाळलेल्या पाण्यामुळे त्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.

### प्रा. कविता आल्हाट यांची कारवाईची मागणी...

दरम्यान, चिखली, कुदळवाडीतील कंपन्या सांडपाणी प्रक्रिया न करता थेट इंद्रायणीत सोडत असल्यामुळे नदी प्रदूषित होत असून आळंदी, देहू, तुळापूर अशा प्रमुख तीर्थक्षेत्रांचा नदीकाठ फेसाळलेला आहे. अशा फेसाळलेल्या नदीत वारकरी बांधव एकादशीच्या दिवशी स्नान करणार का? असा संतप्त सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे महिला अध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांनी विचारला असून अशा कंपन्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाबाबत निवेदनाद्वारे प्रा. कविता आल्हाट यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेचे लक्ष वेधले आहे. याबाबत पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी यांना भेटून आल्हाट यांनी निवेदन दिले आहे.

# मोठ्या प्रकल्पांच्या खर्चाची चौकशी करा!

## » खर्चाच्या प्रकल्पांची चौकशी व्हावी : खा. सुप्रिया सुळे

।पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**अटल सेतूला पडलेल्या भेगा मी पाहिल्या. केवळ या सेतूच्या कामाचीच नाही, तर राज्य सरकारने केलेल्या सर्वच मोठ्या खर्चाच्या प्रकल्पांची चौकशी व्हावी, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी पुण्यात केली. खासदार म्हणून विजयी झाल्यानंतर सुळे यांनी प्रथमच पक्ष कार्यालयाला शनिवारी भेट दिली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शहराध्यक्ष प्रशांत जगताप या वेळी उपस्थित होते.**



पत्रकारांशी बोलताना खासदार सुळे म्हणाल्या, की अटल सेतूचे काम निकृष्ट असल्याचे समोर आले आहे. या सरकारने घाईने कोट्यवधींचे प्रकल्प केले. त्याचा हा परिणाम आहे. या सरकारने केलेल्या अशा सर्वच मोठ्या कामांची चौकशी लावायला हवी. राज्यात पेपरफुटी झाली, शेतकऱ्यांना फसविण्यात आले, बेरोजगारांना काम मिळत नाही, महिलांवर अत्याचार होत आहेत. अशी कोणती गोष्ट आहे, की त्यावर हे सरकार चांगले काम करत आहे? मुलींना विनामूल्य शिक्षण या विषयावर पालकांनी रस्त्यावर येऊन आंदोलन करावे, मी स्वतः त्यात सहभागी होईन. मुलींना विनामूल्य शिक्षण ही घोषणा राज्य सरकारने निवडणुकीपूर्वी केली. त्याचे पुढे काहीच झाले नाही. सर्व पालकांना पैसे जमा करावेच लागले. राज्यातील जातीय संघर्षाला हेच सरकार जबाबदार आहे. केंद्राने जनगणनाच केली नाही. ती झाली नाही म्हणून समोर कसलीही आकडेवारी नाही. मग कशाच्या आधारावर आरक्षण जाहीर केले जाते. घटनेत दुरुस्ती हा केंद्राच्या अखत्यारितील विषय आहे. यापूर्वी सरकार त्यांचेच होते, आता संख्या कमी झाली, तरीही त्यांचेच सरकार आहे. पण ते दुरुस्ती करत नाहीत. कारण त्यांना भांडणेच लावायची आहेत, असेही सुळे यांनी या वेळी सांगितले. या सरकारने घाईने कोट्यवधींचे प्रकल्प केले. त्याचा हा परिणाम आहे. या सरकारने केलेल्या अशा सर्वच मोठ्या कामांची चौकशी लावायला हवी. राज्यात पेपरफुटी झाली, शेतकऱ्यांना फसविण्यात आले, बेरोजगारांना काम मिळत नाही मुलींना विनामूल्य शिक्षण या विषयावर पालकांनी रस्त्यावर येऊन आंदोलन करावे, मी स्वतः त्यात सहभागी होईन. मुलींना विनामूल्य शिक्षण ही घोषणा राज्य सरकारने निवडणुकीपूर्वी केली.

### यापूर्वी सरकार त्यांचेच होते


पत्रकारांशी बोलताना खासदार सुळे म्हणाल्या, की अटल सेतूचे काम निकृष्ट असल्याचे समोर आले आहे. या सरकारने घाईने कोट्यवधींचे प्रकल्प केले. त्याचा हा परिणाम आहे. या सरकारने केलेल्या अशा सर्वच मोठ्या कामांची चौकशी लावायला हवी. राज्यात पेपरफुटी झाली, शेतकऱ्यांना फसविण्यात आले, बेरोजगारांना काम मिळत नाही, महिलांवर अत्याचार होत आहेत. अशी कोणती गोष्ट आहे, की त्यावर हे सरकार चांगले काम करत आहे? मुलींना विनामूल्य शिक्षण या विषयावर पालकांनी रस्त्यावर येऊन आंदोलन करावे, मी स्वतः त्यात सहभागी होईन. मुलींना विनामूल्य शिक्षण ही घोषणा राज्य सरकारने निवडणुकीपूर्वी केली. त्याचे पुढे काहीच झाले नाही. सर्व पालकांना पैसे जमा करावेच लागले.राज्यातील जातीय संघर्षाला हेच सरकार जबाबदार आहे. केंद्राने जनगणनाच केली नाही. ती झाली नाही म्हणून समोर कसलीही आकडेवारी नाही. मग कशाच्या आधारावर आरक्षण जाहीर केले जाते. यापूर्वी सरकार त्यांचेच होते, आता संख्या कमी झाली, तरीही त्यांचेच सरकार आहे. पण ते दुरुस्ती करत नाहीत.

# फायद्यासाठी ‘ओबीसीं’चा प्राण घेऊ नका!

## » पुन्हा आंदोलन करू, असा इशाराही भुजबळ यांनी दिला

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**निवडणुका येतील आणि जातील. पण ओबीसी आरक्षण हा येणाऱ्या पिढ्यांचा प्रश्न आहे. मंडल कमिशनच्या माध्यमातून आम्हाला संघर्ष करून आरक्षण मिळाले आहे. निवडणुकीतील फायद्यासाठी ओबीसींचा प्राण घेऊ नका, असे आवाहन राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी शनिवारी पुण्यातून राज्य सरकारला केले.**



आरक्षणाच्या प्रश्नातून शासनाला मार्ग काढू देण्यासाठी आंदोलन स्थगित केले आहे. अन्याय होतो आहे, असे लक्षात आल्यानंतर पुन्हा आंदोलन करू, असा इशाराही भुजबळ यांनी या वेळी दिला.पुण्यातील ओबीसी उपोषणकर्ते ॲड. मंगेश ससाणे यांची भेट घेण्यासाठी राज्य सरकारचे शिष्टमंडळ पुण्यात आले होते. त्यामध्ये ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, भुजबळ, उद्योगमंत्री उदय सामंत, कृषिमंत्री धनंजय मुंडे, आमदार गोपीचंद पडळकर, प्रकाश शेंडगे, माजी खासदार समीर भुजबळ यांचा समावेश होता. शासनाच्या वतीने ॲड. ससाणे यांना उपोषण मागे घेण्याची विनंती शिष्टमंडळाने केली. राज्य शासनाचे पत्र ससाणे यांना भुजबळ यांनी दिले आणि ससाणे यांनी उपोषण मागे घेतले. भुजबळ म्हणाले, ‘निवडणुका तोंडावर असल्याने ओबीसी आणि मराठा समाज अशा दोन्ही बाजूने काहीजण बोलत आहेत. मात्र, निवडणुका येतील आणि जातील. पण ओबीसी आरक्षण हा पुढच्या पिढ्यांचा प्रश्न आहे. मंडल कमिशनच्या माध्यमातून हे आरक्षण आम्हाला मिळाले आहे. त्यामुळे निवडणुकीच्या फायद्यासाठी ओबीसींचा प्राण घेऊ नका. ही लढाई संपलेली नाही. ही सोपी लढाई नसून खूप काळ लढावी लागणार आहे. हे आंदोलन थांबविलेले नाही, थांबविणार नाही. केवळ स्थगित करत आहोत. आपल्याविरोधात पुन्हा गोष्टी घडत असल्याचे दिसून आल्यास पुन्हा आंदोलन सुरू करू. कुणबी प्रमाणपत्राने आम्हाला धक्के मारून बाहेर काढण्यात येत आहे. सर्व बाजूंनी आमची नाकाबंदी सुरू आहे. आम्ही कुणाचे मागतो का?, त्यांना स्वतंत्र द्या. आमचे जेवढे आहे तेवढे कायम ठेवा, एवढीच आमची मागणी आहे. आमचे आरक्षण पूर्ण भरलेले नाही, तोवरच मागच्या दाराने ओबीसींमध्ये प्रवेश होत आहे, हे थांबले पाहिजे.’

### अन्याय होतो आहे : भुजबळ

महाजन म्हणाले, की समाजात तेढ निर्माण होत आहे, हे राज्यासाठी चांगले नाही.आरक्षणाच्या प्रश्नातून शासनाला मार्ग काढू देण्यासाठी आंदोलन स्थगित केले आहे. अन्याय होतो आहे, असे लक्षात आल्यानंतर पुन्हा आंदोलन करू, असा इशाराही भुजबळ यांनी या वेळी दिला.पुण्यातील ओबीसी उपोषणकर्ते ॲड. मंगेश ससाणे यांची भेट घेण्यासाठी राज्य सरकारचे शिष्टमंडळ पुण्यात आले होते. त्यामध्ये ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, भुजबळ, उद्योगमंत्री उदय सामंत, कृषिमंत्री धनंजय मुंडे, आमदार गोपीचंद पडळकर, प्रकाश शेंडगे, माजी खासदार समीर भुजबळ यांचा समावेश होता. शासनाच्या वतीने ॲड. ससाणे यांना उपोषण मागे घेण्याची विनंती शिष्टमंडळाने केली.

# महापालिका शाळांत शिक्षकांची 'वाणवा'

## शिवसेना ठाकरे गटाची मागणी : रिक्त पदांची नियुक्त करा

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**वाल्हेकरवाडीतील महापालिकेच्या मुलांच्या शाळेमध्ये शिक्षकांची कमतरता आहे. रिक्त जागांवर शिक्षकांची नेमणूक करण्याची मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.**



> सरकारकडून शिक्षणावर भरमसाठ खर्च केला जात आहे. महापालिका प्रशासनाकडून शिक्षक भरती करुनही वाल्हेकरवाडीच्या शाळेत शिक्षकांची कमतरता भासत असेल तर ही दुर्दैवी बाब आहे. एकाच वर्गात दोन वेगवेगळ्या वर्गाचे विद्यार्थी बसवून त्यांना शिकवले जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळा परिसरात पावसाचे पाणी साचलेले आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याला बाधा पोहोचल्यास त्याला कोण जबाबदार? असा प्रश्न वाल्हेकर यांनी उपस्थित केला आहे.
>
> **- पालक, वाल्हेकरवाडी.**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) महिला उपशहर संघटिका ज्योती संदीप भालके यांनी प्रशासकीय अधिकारी संगीता बांगर यांना निवेदन दिले आहे. यावेळी शिवसेना शहर संघटक संतोष सौंदणकर, विभाग प्रमुख संदीप भालके उपशहर प्रमुख हरेश नखाते, उपशहर संघटिका रजनी वाघ, रहाटणी विभाग प्रमुख गोरख पाटील, चिंचवड विभाग प्रमुख किरण दळवी उपस्थित होते. वाल्हेकरवाडी शाळेमध्ये पहिली ते पाचवीची पटसंख्या 350 आहे. तर सहावी ते सातवीचा पट 140 आहे. यानुसार शाळेमध्ये 14 शिक्षकांची आवश्यकता आहे. पटसंख्येनुसार शाळेला अजून 4 उपशिक्षक व 3 पदवीधर शिक्षकांची आवश्यकता आहे. तसेच, मुख्याध्यापिका देखील एक महिन्याने निवृत्त होणार आहेत. मुलांच्या सुट्या संपून शाळा चालू झालेली आहेत, तरी अद्याप शिक्षकांची नेमणूक झालेली नाही.

### .... अन्यथा ठिय्या आंदोलन!

शिक्षकांच्या कमतरतेमुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे वाल्हेकरवाडीतील शाळेतील मुलांची गैरसोय होत असल्याने लवकरात लवकर शिक्षकांची रिक्त पदे भरण्यात यावी,अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच,पुढील 15 दिवसात जर शिक्षकांची नियुक्ती झाली नाही, तर शाळेसमोर ठिय्या आंदोलन करू असा निवेदनाद्वारे इशारा दिला आहे.

# पुरूषांनी सात फेरे मारत केली वटपौर्णिमा साजरी

## पुरूषांनी वटसावित्री साजरी करण्याचा पहिला उपक्रम

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपळे गुरव येथे मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीच्या वतीने पुरूषांनी सात फेरे मारून केली वटपौर्णिमा साजरी केली. मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीच्या वतीने २०१६ पासून वटसावित्री पौर्णिमा सातत्याने साजरी केली जाते. महाराष्ट्रात पुरूषांनी वटसावित्री साजरी करण्याचा पहिला उपक्रम राबणारी हि संस्था आहे.**



प्रत्येक महिला वटवृक्षाप्रमाणे आपल्या पतीला दीर्घ आयुष्य लाभावे व सात जन्मी हाच पती परमेश्वर म्हणून मिळावा म्हणून दीर्घ आयुष्य असणाऱ्या वटवृक्षाची पुजा करण्याची प्रथा आहे. म्हणून आम्ही सात जन्म हिच पत्नी मिळावी म्हणून सात फेरे मारल्याचे उपस्थित पुरूषांनी सांगितले.विकास कुचेकर म्हणाले की, महिलांनी वटवृक्षाची फाद्यी न तोडता प्रतिकात्मक किंवा त्या वटवृक्षाच्या जवळ जाऊन पुजा करावी. पर्यावरणाचा समतोल राखावा पुढील पिढीला जास्तीत जास्त ऑक्सिजन मिळण्यासाठी वटवृक्षाची लागवड करून जतन करण्याचे त्यांनी आव्हान केले. अरूण पवार म्हणाले कि, कोरोना काळात अनेकांना ऑक्सिजन अभावी आपले प्राण गमवावे लागले होते. याचे गांभीर्य ओळखून वृक्ष लागवड केली पाहिजे, आजचे वृक्षारोपण म्हणजे उद्याच्या पिढीसाठी ऑक्सिजनची सोय असे ते म्हणाले. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे उपायुक्त मनोज पाटील म्हणाले की, उच्च शिक्षित स्त्री व पुरुषामध्ये घटस्फोटाचे प्रमाण खूप वाढले आहे. अशा समानतेच्या जनजागृतीच्या उपक्रमामुळे त्यांच्यातील दरी कमी होण्यास मदत होईल. नऊ वर्षापासून पुरुष वटपौर्णिमा आयोजकाचे त्यांनी यावेळी कौतुक केले. शहराध्यक्ष आण्णा जोगदंड म्हणाले की, पत्नी व पती यांना समान कायद्याने आधिकार दिले आहेत. पुरूषप्रधान देशात महिला पण पूरूषांच्या खांद्याला खांदा देऊन खुरपणी पासुन ते नासापर्यत प्रत्येक क्षेत्रात महिला कार्यरत आहेत. पंतप्रधान पदापासून ते राष्ट्रपती पदापर्यंत महिला पोचल्या आहेत. तरीही त्या पतीला दिर्घ आयुष्य मिळावे म्हणून 150 वर्षे आयुष्य आसणाऱ्या वटवृक्षाला सात फेरे प्रदिक्षणा घालतात मनोभावे पुजा करतात. मग पुरुषांनेही जन्मोजन्मी हिच पत्नी मिळावी आणि पत्नीला दिर्घ आयुष्य मिळावे व सात जन्म हिच पत्नी मिळावी म्हणून वटवृक्षाची सात फेरे मारून वटपौर्णिमा साजरी केली तर वावगे ठरू नये. म्हणून आम्हाला सात जन्म हिच पत्नी मिळावी म्हणून आम्ही वटवृक्षाची फेऱ्या मारून सुत घालून, सनई, वाद्य वाजवून मनोभावे पूजा केल्याचे समाधान मिळाले असे आयोजक व पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष अण्णा जोगदंड यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा संगिता जोगदंड म्हणाल्या की, आमच्यासाठी पुरूषांनी सात फेऱ्या मारुन आमच्यासाठी दिर्घ आयुष्य मागितले. यामुळे खूपच आनंद झाला महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पुरुष वटपौर्णिमा साजरी केल्याने आम्ही सर्व महीला आनंदी झालो आहोत.यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष विकास कुचेकर, शहराध्यक्ष अण्णा जोगदंड, कामगार कल्याण उपायुक्त मनोज पाटील, पिंपरी चिंचवड महिला अध्यक्षा मिना करंजावणे, पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा संगिता जोगदंड, मराठवाडा जनविकास संघाचे अध्यक्ष वृक्षमित्र अरुण पवार, जेष्ठ प्रबोधनकार शारदाताई मुंडे, गुणवंत कामगार काळुराम लांडगे, कार्याध्यक्ष गजानन धाराशिवकर, अमोल लोंढे, विकास शहाणे, सुरेश कंक, प्रकाश बंडेवार, राजेंद्र गोराने, आरोग्य मुकादम, विजय कांबळे, लक्ष्मण जोगदंड, जाई जोगदंड, रमेश थोरात, प्रदिप बोरसे, जालिंदर दाते, शंकर नानेकर, शामराव सरकाळे, प्रकाश सावंत, सचिन करंजावणे, इंद्रजित चव्हाण, सारंगी करंजावणे आदी उपस्थित होते.



भूमिका

# राखून ठेवलेला हिरवा शालू

**सुनीतानं खास वटपौर्णिमेसाठी राखून ठेवलेला हिरवा शालू घातला होता. सगळं कसं मॅचिंग मॅचिंग. केसाचा अंबाडा घातला होता. त्यात बो सुद्धा हिरवाच होता. हिरवी टिकली, कानातल्या डुलातील मणीपण हिरव्या रंगाचे. हिरव्या बांगड्या. घड्याळाला हिरवा पट्टा. हिरवी नेलपॉलिश. इतकंच काय चप्पल सुद्धा हिरवीच.**

दोन तीन चांगल्या पावसांमुळे आधीच बाहेर सगळीकडे हिरवाई आलेली. बाहेरच्या धरतीनं हिरवा शालू पांघरला होता आणि आतली धरती म्हणजे घरातील लक्ष्मी सुनीता तर पूर्णच हिरवी झालेली. तसंही नटणं मुरडणं, खरेदी करणं, स्वतःला मिरवणं तिला खूप आवडायचं. तिच्या सौंदर्याचा तिला अभिमानच नाही तर गर्वसुद्धा होता. पूर्ण सजून झाल्यावर ती बैठकीत आली. सोफ्यावर रवींद्र वर्तमानपत्र वाचण्यात मग्न होता. त्याचं लक्ष जावं म्हणून ती खाकरली. मेकअपसाठी तिनं तब्बल दीड तास खर्च केला होता पण रवींद्रनं मान वर करून तिच्याकडे पाहिलं नाही."अहो, रवींद्रराव, सांगा ना मी कशी दिसते?" तिनं लाडात येत म्हटलं. एरवी ती त्याला 'रवींद्र' म्हणून हाक मारायची. कधी कधी तर फक्त 'रवी' म्हणायची. रवींद्रनं मान वर केली आणि पाहतच राहिला. सुनीता खरोखरच स्वर्गातील अप्सरेसारखी दिसत होती. सुंदर तर ती आधीपासूनच होती. तिच्या सुंदरतेकडे पाहूनच तर त्याने तिला लग्नाची मागणी



घातली होती. तो सॉफ्टवेअर इंजिनिअर होता. पॅकेजही खूप मोठ्ठं होतं. त्याला अनेक इंजिनिअर मुली सांगून आल्या होत्या. पण त्याने सुनीताला पाहिलं अन् त्याचा कलिजा खल्लास झाला. "बस, अशीच नाही तर हीच मुलगी मला सहचारिणी म्हणून पाहिजे." असं त्याच्या आतून आवाज आला. आईवडिलांची इंजिनिअर सून आणण्याची इच्छा होती. त्यांना बाह्य सौंदर्यापेक्षा कमवती व सुस्वभावी मुलगी सून म्हणून हवी होती. त्याच्या मामाची मुलगी, रेवती, सुंदरही होती आणि सॉफ्टवेअर इंजिनिअरही. भावानं बहिणीकडे लग्नाचा विषयही काढला होता. रवींद्रचं काहीच म्हणणं नव्हतं. पण त्यानं सुनीताला पाहिलं अन् तो बाकीचं सगळं विसरला. शेवटी आईवडिलांचं मुलाच्या इच्छेपुढे काहीच चाललं नाही आणि नाइलाजानं त्यांनी सुनीताला सून म्हणून स्वीकारण्यास संमती दिली. "सुंदर दिसतेस." तो बोलला. "फक्त सुंदर?" सुनीताला तिची स्तुती कमी झाली असं वाटलं. "सुंदर नाही तर खूपच सुंदर असं म्हणायचं होतं मला." रवींद्रनं मान हलवत म्हटलं. "पण तुमच्या प्रतिक्रियेमध्ये तेवढा सच्चेपणा नाही दिसत." तिनं नाराजीनं म्हटलं. "बरं येऊ का मी? बायका वाट पाहत असतील माझी. तुम्हांला सात जन्म मागायचं मला." ती वेडावून म्हणाली."सात जन्म नको. हा एकच जन्म पुरा." असं रवींद्रला मनातल्या मनात म्हणायचं होतं पण त्याच्या तोंडून मोठ्यानं निघालं."म्हणजे?तुमच्या म्हणण्याचा अर्थ काय?" सुनीतानं दुखावल्या जाऊन म्हटलं."काही नाही. जा तू वडाची पूजा करायला." त्यानं पटकन म्हटलं तशी ती चमकली. तिनं पूजेचं ताट टी पॉयवर ठेवलं. शांतपणे सोफ्यावर त्याच्या शेजारी येऊन बसली. तिचा सगळा उत्साह मावळला होता. तिला खरं तर त्याचा मनातून राग आला होता पण आज वटपौर्णिमेचा दिवस असल्यामुळे व पती परमेश्वर असल्यामुळे तिनं तसं दाखवलं नाही. त्याला कळलं की ती दुखावली होती. तिनं त्याच्या हातातलं वर्तमानपत्र ओढून बाजुला सोफ्यावर ठेवलं व त्याच्याकडे पाहत म्हणाली, "सात जन्म नको म्हणजे नेमकं काय? मी तुम्हांला नको आहे का?" तिच्या डोळ्यांत अश्रू चमकले."अगं, गंमतीनं म्हटलं मी." त्यानं खांदा उडवत म्हटलं."गंमतीनं म्हटलं की सिरिअसली म्हटलं हे न कळण्याइतकी मी दूधखुळी आहे असं वाटते का तुम्हांला?" तिच्या आवाजातली धार त्याला जाणवली."अगं, तुझ्या मैत्रिणी वाट पाहत असतील तुझी." रवींद्रनं दाराकडे पाहत म्हटलं."मला आधी सांगा की एकच जन्म पुरा म्हणजे नेमकं काय? मी सुंदर नाही? मी शिकलेली नाही? मी तुमची काळजी करत नाही की तुमच्यावर प्रेम करत नाही? तुम्हांला असं का वाटावं की नको असलेले शब्द बाहेर पडावेत? " तिनं प्रश्नांची सरबत्ती लावली. "अगं, जा ना. आज वटपौर्णिमा आहे. तुमच्या नटण्या मुरडण्याचा दिवस आहे. आनंदाचा दिवस आहे. आज वाद टाळू या." त्यानं म्हटलं.

**(उत्तरार्ध)**

## संपादकीय »

### लक्षणाची लक्तरे..

***प्रेयसीचा जीव घेणाऱ्या त्या तरुणाच्या हातात धारदार शस्त्र नव्हते. तरीही गर्दीतील एकालाही अटकावासाठी पुढाकार घ्यावासा वाटल्याचे दिसले नाही..***

मोबाइलच्या लहान पडद्यावर हिंसक प्रसंग बघताना जेवढे आपण अलिप्त असतो, तेवढेच प्रत्यक्ष हिंसा बघतानासुद्धा असतो का? हिंसा इतकी अंगवळणी पडली आहे की, समोर घडणारा हिंसक प्रसंग पाहतानाही माणसे अस्वस्थ होत नाहीत? तसे असेल तर त्याचा संबंध 'मला काय त्याचे' या मध्यमवर्गीय मानसिकतेशी आहे का? मग एक समूह अथवा समाज या संकल्पनेतील व्यक्तीचे स्थान काय? असे कोडगे होत जाणे याला जगणे तरी कसे म्हणायचे? समाजमाध्यमांच्या प्रभावापायी असे वारंवार घडू लागले काय? तसे असेल तर या माध्यमावर नियमनाची गरज आता वाटते काय? अलीकडच्या काळातील काही घटना व प्रसंग बघितले की कोणत्याही संवेदनशील मनाला असे प्रश्न सहज पडतील. मात्र अलीकडे अनेकांना ते पडेनासे झालेत.

असेच म्हणायला हवे असे माझे ठाम मत होते, आणि पुण्यातील घटनेने निबंध पुराण अनिर्बंध असायला हवे हे सत्यात उतरवले गेले. समाजात जसे श्रीमंत, उच्च मध्यमवर्गीय, मध्यमवर्गीय, निम्न मध्यमवर्गीय आणि गरीब असतात तसे ते मर्कांच्या रुपात प्रत्येक वर्गात असत.

# निर्बंध नसलेल्या लेखाला निबंध म्हणावे का?

असेच म्हणायला हवे असे माझे ठाम मत होते, आणि पुण्यातील घटनेने निबंध पुराण अनिर्बंध असायला हवे हे सत्यात उतरवले गेले. समाजात जसे श्रीमंत, उच्च मध्यमवर्गीय, मध्यमवर्गीय, निम्न मध्यमवर्गीय आणि गरीब असतात तसे ते मर्कांच्या रुपात प्रत्येक वर्गात असत. श्रीमंत संख्येने कमी असतात, तसे शंभर पैकी शंभर मिळवलेले एक-दोनच असतात, आणि याच क्रमात इतर असतात. मी नेहेमीच गरीब वर्गात मोडत होतो हे तुम्हा सर्वांनी एव्हाना जाणले असेलच. पेपरमधील निबंध सोडून इतर प्रश्न, त्यांची अचूक उत्तरे देणे, गरजेचे असे, नाहीतर भोपळा मिळालाच म्हणून समजा, तिथे काहीही लिहा आणि गुण मिळवा, हे सूत्र चालत नसते. तिथे धडे मन लावून वाचूनच उत्तरे लिहावी लागतात, म्हणजे खराखुरा अभ्यास केल्याशिवाय पर्याय नसतो. निबंध लिहिण्यासाठी वेगळी तयारी म्हणून कधीच करण्याची गरज नसते, तिथे जे सुचेल ते लिहावे, आणि कंटाळा येईपर्यंत लिहीत राहावे असे काहीसे मत



माझ्यासारख्या काठावर पास गणांचे (गोटे) होते. म्हणून सर्व पेपर सोडवून झाला की मग निबंध लिहायला घ्यावे, असाच काहीसा नियम घालून दिलेला होता. हे सर्व नियम सर्व भाषेतील विषयांच्यासाठी सारखेच होते. अनेकदा हिंदीच्या पेपरमध्ये, निबंध लिहिताना, मध्येच दोनतीन मराठी ओळी पण सहज लिहून, लांबी वाढवण्याची करामत मी केली आहे, असे असतानाही मला दहा पैकी सात-आठ गुण मिळालेले मी अनेकदा पाहिले आहे. आमच्यातील मझ्यासहित अनेकांचा काहीसा समज होता की, शिक्षक निबंध वाचण्याच्या भानगडीत पडत नाहीत. तो किती लांब लिहिला गेला आहे, इतकेच पाहून गुण देतात. फक्त अत्यंत हुशार मुलांचे निबंध गुरुजी मन लावून वाचून त्यांना पैकीच्या पैकी मार्क देत असत. वर दिलेल्या उदाहरणातून तर माझी पूर्ण खात्री झाली होती, कारण जिथे चार वा पाच मार्क मिळायला हवेत तिथे आठ मार्क गुरुजींनी दिले म्हणजे नक्कीच त्यांनी निबंध वाचलाच नाही हे मनोमन पटते.

शिक्षक आमच्यासारखे गोटे, पास करण्यासाठी कमी पडणाऱ्या गुणांची, भरपाई म्हणून निबंधाला भरपूर गुण देवून विद्यार्थी वरती ढकलत असत. हे सर्व मला कसं माहिती, म्हणाल तर त्या ढकलल्या गेलेल्या विद्यार्थ्यांच्यात माझी वर्णी न चुकता असे, हे आता वेगळे सांगायला नको. बाकी, मी फक्त ३०० शब्दांचा निबंध लिहिला आहे, हे खात्रीने सांगतो. न जाणो हातून काही अघटीत घडलेच तर, निबंध लिहिण्याची सवय हवी, नाही का? वेळेवर पंचाईत होऊ नये, म्हणून हात साफ करून घेतला आहे. आत्मीयतेने, न जांभई देता वाचणाऱ्या माझ्या लाडक्या वाचकांसाठी माझा हा निबंध समर्पित.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पवारांना महायुतीत एकटं पाडलं जातंय

## महायुतीपासून विभक्त होऊन निवडणूक लढावी : मिटकरी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अजित पवार यांनी महायुतीतून बाहेर पडून आगामी विधानसभा निवडणुकीला एकट्याने सामोरं जावं यासाठी महायुतीतील काही लोक प्रयत्न करत असल्याचा आरोप आमदार अमोल मिटकरी यांनी केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटातील आमदार (विधान परिषद) अमोल मिटकरी म्हणाले, "महायुतीत गेल्या काही दिवसांमध्ये घडलेल्या घटना पाहिल्या तर लक्षात येईल की अजित पवारांना एकटं पाडण्याचा प्रयत्न केला जातोय. आता विधान परिषदेच्या निवडणुका आहेत.**



नाशिकमध्ये त्यांनी (महायुती) आम्हाला पाठिंबा देण्याऐवजी शिवसेनेच्या ठाकरे गटाला पाठिंबा दिल्याचं आम्हाला समजलं आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने अजित पवारांवर केलेली टीका, परवा (२० जून) शिवसेनेच्या शिंदे गटातील नेते रामदास कदम यांनी आमच्या पक्षाबाबत केलेलं वक्तव्य, या सगळ्या गोष्टी पाहिल्या तर असं लक्षात येतंय की महायुतीत आम्हाला एकटं पाडण्याचा प्रयत्न केला जात आहे."अमोल मिटकरी म्हणाले, "माझी महायुतीमधील नेत्यांना विनंती आहे की त्यांनी अजित पवारांना एकटं पाडण्याचा प्रयत्न करू नये. आमचे वरिष्ठ मला नेहमी ताकीद देत असतात, मी ती ताकीद ऐकतो, परंतु याचा अर्थ असा नाही की कोणीही यावं आणि आम्हाला बोलावं. हे खपवून घेतलं जाणार नाही." मिटकरी यांनी काही वेळापूर्वी एबीपी माझाशी बातचीत केली. यावेळी त्यांनी महायुतीवरील संताप व्यक्त केला."राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अजित पवार गटाने आगामी विधानसभेला महायुतीपासून विभक्त होऊन निवडणूक लढावी, यासाठी प्रयत्न चालू आहेत का? असा प्रश्न विचारल्यावर अमोल मिटकरी म्हणाले, "काही लोकांचे असेच प्रयत्न आहेत. अजित पवार यांनी महायुतीत राहू नये यासाठी त्यांचं नुकसान करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अजित पवारांनी स्वतःहून महायुतीपासून वेगळं व्हायला हवं, यासाठी अजित पवार आणि आमच्या पक्षाला मानसिक त्रास दिला जातोय. आमच्या पक्षाचं नुकसान करण्याचा प्रयत्न केला जातोय. परंतु, आम्ही ते होऊ देणार नाही." महायुतीकडून तुम्हाला वेगळं करण्याचा, एकटं पाडण्याचा प्रयत्न होत असताना तुमच्याकडे प्लॅन बी आहे का? किंवा स्वबळावर, इतर कुठल्या पक्षाबरोबर युती करून निवडणूक लढण्याचा विचार पक्षाने केला आहे का? असा प्रश्न विचारल्यावर अमोल मिटकरी म्हणाले, "स्वबळावर लढण्याबाबत विचार झाला आहे. काही आमदारांनी त्यास अनुकूलता दर्शवली आहे. परंतु, काही आमदारांचं असं म्हणणं आहे की त्यांच्या मतदारसंघात महायुतीतच निवडणूक लढवली पाहिजे. कारण महायुतीत त्यांची ताकद आहे. तर काही आमदार स्वतंत्र लढण्यासाठी तयार आहेत."अजित पवार गटातील आमदार म्हणाले, "विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपात आमची ५० ते ५५ जागांवर बोळवण होत असेल तर मग आम्ही वेगळा मार्ग निवडू शकतो. त्याचा निर्णय अर्थातच वरिष्ठ पातळीवर होईल. मला महायुतीमधील इतर पक्षांना सांगायचं आहे की त्यांनी आम्हाला कमजोर समजू नये. अजित पवार एकटेच जातील, एकटेच निवडणूक लढतील, असे समजू नये." नाशिकमध्ये त्यांनी (महायुती) आम्हाला पाठिंबा देण्याऐवजी शिवसेनेच्या ठाकरे गटाला पाठिंबा दिल्याचं आम्हाला समजलं आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने अजित पवारांवर केलेली टीका, परवा (२० जून) शिवसेनेच्या शिंदे गटातील नेते रामदास कदम यांनी आमच्या पक्षाबाबत केलेलं वक्तव्य, या सगळ्या गोष्टी पाहिल्या तर असं लक्षात येतंय की महायुतीत आम्हाला एकटं पाडण्याचा प्रयत्न केला जात आहे."अमोल मिटकरी म्हणाले, "माझी महायुतीमधील नेत्यांना विनंती आहे की त्यांनी अजित पवारांना एकटं पाडण्याचा प्रयत्न करू नये.

### हे खपवून घेतलं जाणार नाही

आमचे वरिष्ठ मला नेहमी ताकीद देत असतात, मी ती ताकीद ऐकतो, परंतु याचा अर्थ असा नाही की कोणीही यावं आणि आम्हाला बोलावं. हे खपवून घेतलं जाणार नाही." मिटकरी यांनी काही वेळापूर्वी एबीपी माझाशी बातचीत केली. यावेळी त्यांनी महायुतीवरील संताप व्यक्त केला."राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अजित पवार गटाने आगामी विधानसभेला महायुतीपासून विभक्त होऊन निवडणूक लढावी, यासाठी प्रयत्न चालू आहेत का? असा प्रश्न विचारल्यावर अमोल मिटकरी म्हणाले, "काही लोकांचे असेच प्रयत्न आहेत. अजित पवार यांनी महायुतीत राहू नये यासाठी त्यांचं नुकसान करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अजित पवारांनी स्वतःहून महायुतीपासून वेगळं व्हायला हवं, यासाठी अजित पवार आणि आमच्या पक्षाला मानसिक त्रास दिला जातोय. आमच्या पक्षाचं नुकसान करण्याचा प्रयत्न केला जातोय. परंतु, आम्ही ते होऊ देणार नाही." महायुतीकडून तुम्हाला वेगळं करण्याचा, एकटं पाडण्याचा प्रयत्न होत असताना तुमच्याकडे प्लॅन बी आहे का? किंवा स्वबळावर, इतर कुठल्या पक्षाबरोबर युती करून निवडणूक लढण्याचा विचार पक्षाने केला आहे का? असा प्रश्न विचारल्यावर अमोल मिटकरी म्हणाले, "स्वबळावर लढण्याबाबत विचार झाला आहे. काही आमदारांनी त्यास अनुकूलता दर्शवली आहे.

# अमरावतीत खासदार कार्यालयाचा वाद पेटला

## यशोमती ठाकूर आणि चंद्रकांत पाटलांमध्ये जोरदार बाचाबाची

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अमरावतीत खासदार कार्यालयाचा वाद पेटला आहे. भाजपाच्या उमेदवार नवनीत राणा यांचा पराभव होऊनही त्यांनी कार्यालय न सोडल्याने यशोमती ठाकूर यांनी कुलूप तोडून नवनिर्वाचित खासदार बळवंत वानखेडे यांच्यासह प्रवेश केला.**

याआधी यशोमती ठाकूर आणि चंद्रकांत पाटील यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक झाली. खासदार कार्यालयाचा ताबा दिला जात नसल्याने यशोमती ठाकूर आणि पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यात जोरदार वाद झाला. चावी दिली जात नसल्याने अखेर यशोमती ठाकूर यांनी कार्यालयात ताब्यात घेण्याचा इशारा देत कुलूप तोडलं. याआधी यशोमती ठाकूर आणि चंद्रकांत पाटील यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक झाली. आम्हाला हे सरकार दुजाभावाची वागणूक देत आहे असंही त्या म्हणाल्या. कार्यालयाचा ताबा




देत नसल्याने यशोमती ठाकूर, बळवंत वानखेडे जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले होते. यावेळी तिथे पालकमंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते. यशोमती ठाकूर यांनी यावेळी चंद्रकांत पाटील यांना हे बरोबर नाही असं सांगत संताप व्यक्त केला. तसंच ही खासदारांशी वागण्याची पद्धत नाही सांगत अधिकाऱ्यांना जाब विचारला. गरीब व्यक्ती खासदार झाला म्हणून अशी वागणूक देता का? अशी विचारणाही त्यांनी केली. आम्ही इतकी दादागिरी नाही केली, आम्ही तर तुम्हा अधिकाऱ्यांना मीटिंगमध्ये घेऊन बसत होतो अशी आठवण यशोमती ठाकूर यांनी अधिकाऱ्यांना करुन दिली. तुम्हाला आमच्यावर हवे तर गुन्हे दाखल करा. आम्ही तुम्हाला सांगून ऑफिस ताब्यात घेत आहोत असं त्यांनी चंद्रकांत पाटलांना सांगितलं. आम्ही शांततेच्या मार्गाने चालणारे, संयम ठेवणारे लोक आहे.

### आम्ही लोकशाही मार्गाने निवडून आलो

जिल्हाधिकाऱ्यांवर दबाव असेल तर ते काय करणार? आमचं सर्टिफिकेट 3 तास उशिरा दिलं. खासदारांनी त्यांना महिन्याभरापूर्वी कार्यालय द्यावं यासाठी पत्र लिहिलं आहे. काल मागणी केली तर म्हणतात की, आता ते विभागलं असून राज्यसभेचा खासदारही येथेच बसणार. म्हणजे यांची इतकी दादागिरी, दडपशाही आहे. आम्ही हे सहन करणार नाही. आम्ही लोकशाही मार्गाने निवडून आलो असून आमच्या खासदाराचा सन्मान राखला पाहिजे.

# शेतकऱ्यांचं 31 हजार कोटींचं कर्ज माफ

## कर्ज माफ करण्याचं आश्वासन दिलं होतं : राहुल गांधी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**गेल्या वर्षी तेलंगणात झालेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यातील जनतेने काँग्रेसवर विश्वास दाखवला. त्यानंतर राज्यात रेवंत रेड्डी यांचं सरकार आलं. विधानसभा निवडणुकीच्या जाहिरनाम्यात काँग्रेसने शेतकऱ्यांचं कर्ज माफ करण्याचं आश्वासन दिलं होतं, जे आता रेवंत रेड्डी सरकारने पूर्ण केलं आहे.**



राज्यातील शेतकऱ्यांच्या ३१ हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री रेड्डी यांनी शेतकरी प्रश्नावर आज (२२ जुलै) सकाळी मंत्रिमंडळाची बैठक बोलावली होती. या बैठकीत कर्जमाफीचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानंतर मुख्यमंत्री रेड्डी यांच्यासह काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि खासदार राहुल गांधी यांनी तेलंगणामधील शेतकऱ्यांचं अभिनंदन केलं आहे.दरम्यान, कर्जमाफीच्या घोषणेनंतर राहुल गांधी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की “आम्ही जे बोललो ते करून दाखवलं.” राहुल यांनी म्हटलं आहे की तेलंगणामधील शेतकरी कुटुंबांचं अभिनंदन, काँग्रेस सरकारने तुमचं दोन लाख रुपयांपर्यंतचं कर्ज माफ केलं आहे. यासह ‘शेतकरी न्याय’ संकल्प पूर्ण करण्याच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल टाकलं आहे. या निर्णयामुळे राज्यातील ४० लाख शेतकरी कर्जमुक्त झाले आहेत. आम्ही जे बोललो ते करून दाखवलं, हीच आमची नियत आणि सवय आहे.राहुल यांनी म्हटलं आहे की काँग्रेस सरकार शेतकरी आणि मजुरांसह वंचितांच्या बळकटीकरणासाठी काम करणारा पक्ष आहे. शेतकरी, मजूर आणि वंचितांसाठी राज्याच्या तिजोरीतून पैसे खर्च होतील याची काँग्रेसकडून हमी दिली जाते. आजचा ऐतिहासिक निर्णय त्याचंच उत्तम उदाहरण आहे. जिथे-जिथे काँग्रेस सत्तेत असेल तिथे-तिथे हिंदुस्तानचं धन हिंदुस्तानी नागरिकांसाठी खर्च केलं जाईल.काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी देखील तेलंगणा सरकारच्या या निर्णयानंतर राज्यातील शेतकरी कुटुंबांचं अभिनंदन केलं आहे. प्रियांका गांधी यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये लिहिलं आहे की काँग्रेस पक्षाने तेलंगणातील शेतकऱ्यांचं कर्ज माफ करण्याचं वचन दिलं होतं. आम्ही ते वचन पूर्ण केलं आहे. तेलंगणातील रेवंत रेड्डी सरकारच्या या निर्णयामुळे कर्जाच्या ओझ्याखाली असलेल्या ४० लाख शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. देशातील सर्व संपत्तीवर देशातील जनतेचा अधिकार आहे. त्यामुळे हे पैसे केवळ जनतेवर खर्च व्हायला हवेत आणि हाच काँग्रेसचा मंत्र आहे. सरकारने नेहमी नागरिकांचं, शेतकरी, कष्टकरी आणि मजुरांचं हित जोपासलं पाहिजे. काँग्रेस सरकारने यापूर्वी राजस्थान आणि छत्तीसगडमधील शेतकऱ्यांचंही कर्ज माफ केलं होतं. केंद्रात आमचं सरकार असताना आम्ही देशभरातील शेतकऱ्यांचं ७२ हजार कोटी रुपयांचं कर्ज माफ केलं होतं.राज्यातील शेतकऱ्यांच्या ३१ हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या बैठकीत कर्जमाफीचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानंतर मुख्यमंत्री रेड्डी यांच्यासह काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि खासदार राहुल गांधी यांनी तेलंगणामधील शेतकऱ्यांचं अभिनंदन केलं आहे.

### कर्ज माफ करण्याचं वचन दिलं होतं

दरम्यान, कर्जमाफीच्या घोषणेनंतर राहुल गांधी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की “आम्ही जे बोललो ते करून दाखवलं.” राहुल यांनी म्हटलं आहे की तेलंगणामधील शेतकरी कुटुंबांचं अभिनंदन, काँग्रेस सरकारने तुमचं दोन लाख रुपयांपर्यंतचं कर्ज माफ केलं आहे. यासह ‘शेतकरी न्याय’ संकल्प पूर्ण करण्याच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल टाकलं आहे. या निर्णयामुळे राज्यातील ४० लाख शेतकरी कर्जमुक्त झाले आहेत. आम्ही जे बोललो ते करून दाखवलं, हीच आमची नियत आणि सवय आहे.राहुल यांनी म्हटलं आहे की काँग्रेस सरकार शेतकरी आणि मजुरांसह वंचितांच्या बळकटीकरणासाठी काम करणारा पक्ष आहे. शेतकरी, मजूर आणि वंचितांसाठी राज्याच्या तिजोरीतून पैसे खर्च होतील याची काँग्रेसकडून हमी दिली जाते. आजचा ऐतिहासिक निर्णय त्याचंच उत्तम उदाहरण आहे. जिथे-जिथे काँग्रेस सत्तेत असेल तिथे-तिथे हिंदुस्तानचं धन हिंदुस्तानी नागरिकांसाठी खर्च केलं जाईल.काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी देखील तेलंगणा सरकारच्या या निर्णयानंतर राज्यातील शेतकरी कुटुंबांचं अभिनंदन केलं आहे. प्रियांका गांधी यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये लिहिलं आहे की काँग्रेस पक्षाने तेलंगणातील शेतकऱ्यांचं कर्ज माफ करण्याचं वचन दिलं होतं.

# पेपरफुटीला आळा : केंद्राचा कठोर कायदा


## दहा वर्षांचा कारावास ते 1 कोटीच्या दंडाची तरतूद!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) पेपर लीकप्रकरणी देशभर गदारोळ झाल्यानंतर केंद्र सरकारने शुक्रवारी एका कठोर कायद्याची अंमलबजावणी केली आहे. त्यामुळे स्पर्धात्मक परीक्षांमधील गैरप्रकार आणि अनियमितता रोखता येणार आहे. शुक्रवारी (२१ जून) रात्रीपासून लागू झालेल्या या कायद्यात गुन्हेगारांना कमाल १० वर्षांचा तुरुंगवास आणि १ कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे.**

इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**परीक्षा प्राधिकरण, सेवा पुरवठादार किंवा इतर कोणत्याही संस्थेसह एखादी व्यक्ती किंवा व्यक्तींच्या गटाने संघटित गुन्हा केल्यास, त्यांना पाच वर्षांपेक्षा कमी नसलेल्या परंतु दहा वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि दंड १ कोटी रुपयांची तरतूद या कायद्यात नमूद करण्यात आली आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग , स्टाफ सिलेक्शन कमिशन , रेल्वे, बँकिंग भरती परीक्षा आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे घेतलेल्या सार्वजनिक परीक्षांमध्ये अन्यायकारक मार्ग रोखणे हे या कायद्याचे उद्दिष्ट आहे. या वर्षी फेब्रुवारीमध्ये संसदेने सार्वजनिक परीक्षा कायदा २०२४ मंजूर केला होता. या कायद्यात फसवणुकीला आळा घालण्यासाठी किमान तीन ते पाच वर्षांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे आणि फसवणुकीच्या संघटित गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्यांना पाच ते दहा वर्षांचा तुरुंगवास आणि किमान शिक्षेची तरतूद आहे. तसंच एक कोटी रुपयांच्या दंडाचीही तरतूद करण्यात आली आहे. या कायद्याची अंमलबजावणी शुक्रवारी मध्यरात्रीच करण्यात आली. ६ फेब्रुवारी रोजी लोकसभेत आणि ९ फेब्रुवारी रोजी राज्यसभेत हा कायदा पारीत झाला होता. तर, २१ जून रोजी मध्यरात्रीपासून या कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली.**



### कायद्यात शिक्षा आणि दंडाची तरतूद

प्रश्नपत्रिका किंवा उत्तरपत्रिका लीक करणे, परीक्षेदरम्यान उमेदवारांना बेकायदा मदत करणे, संगणक नेटवर्क किंवा संसाधनांशी छेडछाड करणे, बोगस उमेदवार परीक्षेला बसवणे, बनावट परीक्षा आयोजित करणे किंवा बनावट कागदपत्रे जारी करणे आणि गुणवत्तेसाठी कागदपत्रांशी छेडछाड करणे याविरोधात या कायद्यात शिक्षा आणि दंडाची तरतूद करण्यात आली आहे. कायद्यांतर्गत येणारे गुन्हे अजामीनपात्र आहेत. पोलीस उपअधीक्षक किंवा सहाय्यक पोलीस आयुक्त पदापेक्षा कमी दर्जाचा कोणताही अधिकारी या कायद्यान्वये कोणत्याही गुन्ह्याचा तपास करू शकतो.

# राखीला अटक होण्याची शक्यता

बॉलिवूडची 'ड्रामा क्वीन' राखी सावंत (RAKHI SAWANT) नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. पण आता अभिनेत्रीच्या अडचणीत वाढ झाली आहे. 'ड्रामा क्वीन' राखी सावंतला कोणत्याही क्षणी अटक होऊ शकते. अभिनेत्रीला अटकपूर्व जामीन देण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. खासजी आणि आक्षेपार्ह व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केल्याप्रकरणी विभक्त पती आदिल खान दुर्रानीने (ADIL KHAN DURRANI) राखी सावंत विरोधात तक्रार दाखल केली होती. पण आता ड्रामा क्वीनला अटकेपासून दिलासा देण्यास दिंडोशी सत्र न्यायालयाने नकार दिला आहे. अभिनेत्री राखी सावंत सोशल मीडियावर चांगलीच ॲक्टिव्ह आहे. काही दिवसांपूर्वी तिने विभक्त पती आदिल खान दुर्रानीचा एक खासजी आणि आक्षेपार्ह व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला होता. बदनामी करण्याच्या हेतूने राखीने व्हिडीओ शेअर केल्याचा दावा आदिलने केला होता. आदिल दुर्राणीने राखी सावंत विरोधात अंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. आदिलच्या तक्रारीनुसार पोलिसांनी राखी सावंतवर गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर अभिनेत्रीने अटकपूर्व जामिनासाठी दिंडोशी न्यायालयात धाव घेतली. आपल्याला खोट्या प्रकरणात सामील केले जात असून त्रास देण्याच्या उद्देशाने गुन्हा दाखल केल्याचा दावा 'ड्रामा क्वीन'ने केला होता. पण राखीने अटकपूर्व जामिनासाठी केलेला अर्ज दिंडोशी न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीकांत भोसले यांनी फेटाळला आहे.

# तेजस्विनी पंडित साकारतेय 'स्वराज्य कनिका

राष्ट्रमाता, राजमाता जिजाबाई शहाजीराजे भोसले... यांनी हिंदवी स्वराज्याची पायाभरणी करून या मुलुखाला छत्रपती शिवाजी महाराज दिले .बुद्धिमत्ता, चातुर्य, पराक्रम, शौर्य, दूरदृष्टी, कुशल राजनिती, कुटुंबवत्सल असे सगळेच गुण त्यांच्यात होते. शिवबाचे शिवराय घडवताना या माऊलीने अनेक वादळं पेलली. पण, या वादळात ही तेजस्वी ज्योत आणखी प्रखर झाली. प्रत्येक कसोटीवर खऱ्या उतरून या माऊलीने स्त्रीशक्ती व मातृशक्तिचे चिरंतन उदाहरण आपल्या सर्वांस दिले. जगाला दिशा देणाऱ्या या जगत्जननीच्या आयुष्यावर आधारित 'स्वराज्य कनिका जिजाऊ' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच 'स्वराज्य कनिका जिजाऊ' या चित्रपटाची घोषणा करण्यात आली असून या चित्रपटात जिजाऊंची भूमिका मराठी अभिनेत्री तेजस्विनी पंडित ( TEJASWINI PANDIT ) साकारणार आहे. या चित्रपटाचे पोस्टर झळकले असून राजमाता जिजाऊ यांची करारी मुद्रा यात दिसत आहे. चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन अनुजा देशपांडे या करत आहेत. दिग्दर्शिका अनुजा देशपांडे म्हणाल्या की, "राजा नंतर घडतो, आधी घडते ती राजमाता" राजमाता जिजाऊसाहेब या लोकजीवनाला जोडणारी अस्मिता तर आहेतच पण त्याचबरोबर मराठी माणसाला त्याच्या अस्तित्वाची-सामर्थ्याची जाणीव करून देणारी एक शक्ती आहेत. हा अभिमान व जाणीव उराशी बाळगून वीरकन्या ते वीरमातेच्या जीवनकाळचे कथानक २-२.३० तासात मांडणे एक लेखिका म्हणून माझ्यासाठी आव्हानात्मक होते.

# तमन्ना महेश बाबू एकत्र

बॉलिवूडच्या झगमगत्या जगात भारतातील स्टार तमन्ना भाटिया आणि महेश बाबू ही डायनॅमिक जोडी एकत्र स्पॉट झाली. एका सेट वर हे दोघ एकत्र सोबत दिसले हे क्षण काही लोकांनी कॅप्चर केले आणि ज्यामुळे चाहते आणि फिल्म इंडस्ट्रीत एक वेगळा उत्साह निर्माण झाला आहे. लोकांमध्ये वेगळीच उत्सुकता या नंतर बघायला मिळतेय. अपवादात्मक ऑन-स्क्रीन केमिस्ट्रीसाठी ओळखल्या जाणाऱ्या या जोडीने यापूर्वी यशस्वी प्रोजेक्ट्स केले आहेत. आता हे दोघे पुन्हा एकत्र काम करणार का? काही नव्या प्रोजेक्टमध्ये सोबत दिसणार का? अशा प्रश्नांना उधाण आलं आहे. व्हायरल फोटो आश्वासक ऊर्जा आणि इंडस्ट्रीतसोबत सहकार्याबद्दल अंदाज व्यक्त करत आहेत. सूत्रांनुसार "तमन्ना आणि महेशची केमिस्ट्री जादुई आहे प्रत्येक सोबतीचा प्रोजेक्ट्स सिनेमॅटिक अनुभव देणारा असतो यात शंका नाही. त्यांच्या येणाऱ्या प्रकल्पाचे तपशील गोपनीय असून येणाऱ्या काळात हे दोघे सोबत काम करतील. "सोशल मीडियावर याची अधिकृत घोषणा होण्याची सगळेच आतुरतेने वाट पाहत आहेत. तमन्ना भाटिया आणि महेश बाबू यांच्या सहकार्याभोवती सुरू असलेल्या चर्चांना उधाण तर आलं आहे आणि सिनेमॅटिक अनुभव अनुभवयाला सगळेच उत्सुक आहेत.



# मिस्ट्री मॅनसोबत दिसली ड्रामाक्वीन

बॉलीवूड ड्रामाक्वीन कंगना राणौत मुंबईतील सलूनमधून बाहेर पडताना दिसली. यावेळी अभिनेत्री एका मिस्ट्री मॅनसोबत (KANGANA RANAUT WITH MYSTERY MAN) होती. यावेळी कंगनने अतिशय सुंदर स्काय ब्लू कलरचा स्कर्ट तसेच गॉगल घातला होता. तिच्यासोबत दिसणारा रहस्यमय माणूस हा परदेशी होता. दोघेही एकमेकांचे हात घट्ट पकडून सलूनच्या बाहेर आले. त्यानंतर हे फोटो वणव्यासारखे व्हायरल झाले. मिस्ट्री मॅनसोबत अभिनेत्री कंगनाचे हे फोटो पाहून लोक या फिल्म स्टारच्या लिंकअपबद्दल अंदाज बांधताना दिसत आहेत. कंगना मिस्ट्री मॅनसोबत सलूनमधून बाहेर पडताना दिसल्यानंतर लिंकअपच्या बातम्या तीव्र झाल्या. यावेळी या मिस्ट्री मॅनने अभिनेत्री कंगना राणौतचा हात घट्ट पकडला होता. दोघेही चाहत्यांना कपल वाइब्स देताना दिसले. हे फोटो पाहिल्यानंतर सर्वजण अंदाज लावत आहेत की अभिनेत्री कंगना राणौत परदेशी पुरुषाच्या प्रेमात पडली आहे. चित्रपट स्टार कंगना राणौत या मिस्ट्री मॅनसोबत जोडी करताना एकदम परफेक्ट दिसत होती. दोघांचे हे फोटो येताच व्हायरल होऊ लागले. यावेळी पापाराझी पाहून अभिनेत्री कंगना राणौतला लाज वाटू लागली. अभिनेत्रीचे हे फोटोज वाऱ्यासारखे व्हायरल होत आहेत. अनेकदा मीडिया कर्मचाऱ्यांशी मोकळेपणाने बोलणारी अभिनेत्री कंगना राणौत यावेळी पापाराझींना टाळताना दिसली. अभिनेत्री कंगना राणौतचे हे फोटो पाहून तिचे चाहते यावेळी खूप खूश आहेत. या फोटोंवर कमेंट करताना लोकांनी लिहिले, 'राणीला राजा मिळाला आहे.' कंगनाचे तिच्या मिस्ट्री मॅनसोबतचे हे फोटो पाहिल्यानंतर अनेक लोक अंदाज लावत आहेत की ही अभिनेत्री लवकरच लग्न करू शकते. अभिनेत्री कंगना राणौतचे हे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागले आहेत. लोक या फोटोंवर जोरदार कमेंट करत आहेत.

# 'ॲनिमल'मुळे तृप्तीला मिळाली लोकप्रियता

संदीप रेड्डी वंगा (SANDEEP REDDY VANGA) दिग्दर्शित ॲनिमल (ANIMAL) या चित्रपटामुळे अभिनेत्री तृप्ती डिमरीला (TRIPTI DIMRI) विशेष लोकप्रियता मिळाली. या चित्रपटामधील तृप्ती आणि रणबीर कपूरच्या इंटिमेट सीन्सनं अनेकांचे लक्ष वेधले. सध्या ॲनिमलचा सक्सेस एन्जॉय करत असणाऱ्या तृप्तीनं काही दिवसांपूर्वी एका इव्हेंटला हजेरी लावली. या इव्हेंटमधील तृप्तीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. अशातच या इव्हेंटमधील एका व्हिडीओनं अनेकांचे लक्ष वेधले. ज्यामध्ये तृप्ती ही ओरीसोबत फोटोसाठी पोज देताना दिसली. AJIO LUXE WEEKEND या इव्हेंटला तृप्ती आणि ओरीनं हजेरी लावली. यावेळी ओरी हा ब्लू डेनिम पॅंट आणि ऑरेंज टीशर्ट अशा लूकमध्ये दिसला. तर तृप्ती ही पिवळ्या रंगाचा ड्रेस, सिल्वर कलरचे फुटवेअर आणि मोकळे केस अशा लूकमध्ये दिसली. ओरी आणि तृप्तीनं फोटोसाठी एकत्र पोज दिल्या. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमध्ये दिसले की, ओरी हा तृप्तीला मिठी मारतो त्यानंतर तो तिच्या गालावर किस करतो. ओरी आणि तृप्तीच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला. एका नेटकऱ्यानं व्हिडीओला कमेंट केली, बॉलिवूडमधील अनेक जण ओरीचे फॅन्स आहेत. तृप्ती डिमरीला ॲनिमल या चित्रपटामुळे विशेष लोकप्रियता मिळाली. ॲनिमल हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला. या चित्रपटामधील तृप्ती आणि रणबीरच्या इंटिमेट सीन्सची चर्चा सोशल मीडियावर झाली. एका मुलाखतीमध्ये तृप्तीनं ॲनिमल चित्रपटातील इंटिमेट सीन्सबद्दल सांगितलं. ती म्हणाली, " सेटवर फक्त चार-पाच लोक होते. दर पाच मिनिटांनी ते सर्व लोक मला विचारत होते, 'तू ठीक आहेस ना?' तुला काही हवे आहे का? तुला कम्फर्टेबल वाटत आहे का?' ॲनिमल या चित्रपटाच्या आधी तृप्तीनं 'बुलबुल' आणि 'कला' या चित्रपटांमध्ये काम केलं आहे. ओरीचं खरं नाव ओरहान अवत्रामणी असं आहे. ओरी हा विविध बॉलिवूड पार्ट्यांमधील फोटो सोशल मीडियावर शेअर करतो. या फोटोमध्ये ओरी आणि बॉलिवूडमधील अनेक कलाकार दिसतात. ओरी नेमकं काय काम करतो? त्याची लाईफस्टाईल कशी आहे? या सर्व गोष्टींबाबत जाणून घेण्यास नेटकरी उत्सुक असतात.या चित्रपटामधील तृप्ती आणि रणबीर कपूरच्या इंटिमेट सीन्सनं अनेकांचे लक्ष वेधले. सध्या ॲनिमलचा सक्सेस एन्जॉय करत असणाऱ्या तृप्तीनं काही दिवसांपूर्वी एका इव्हेंटला हजेरी लावली. या इव्हेंटमधील तृप्तीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. अशातच या इव्हेंटमधील एका व्हिडीओनं अनेकांचे लक्ष वेधले.



# अर्धशतक शतक करण्याची गरज नसते

## भारताच्या विजयानंतर रोहित शर्मा हे काय बोलून गेला

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**टी-२० विश्वचषक २०२४ च्या सुपर८ फेरीतील सलग दुसरा सामना भारताने जिंकला आहे. भारताने ॲंटिगामध्ये झालेल्या सामन्यात बांगलादेशविरूद्ध ५० धावांनी मोठा विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना भारताच्या सर्वच फलंदाजांनी धावांची भर घालत भारताची धावसंख्या १९६ पर्यंत नेली. भारताच्या धावसंख्येत सर्वात मोठं योगदान हार्दिक पंड्याने दिलं. हार्दिकने झंझावाती अर्धशतक झळकावत भारताला मोठ्या धावसंख्येपर्यंत नेले. तर रोहित शर्मा २३, विराट कोहली ३७, ऋषभ पंत ३६ आणि शिवम दुबे ३४ धावांचे योगदान दिले. या सहज मिळवलेल्या विजयानंतर रोहित शर्माने मोठे वक्तव्य केले आहे, ज्यामुळे सर्वांचे लक्ष वेधलं आहे.**




बांगलादेशा ५० धावांनी पराभव करत सलग दुसऱ्या विजयासह उपांत्य फेरीतील आपला दावा मजबूत केला. या विजयासह भारताचे पहिल्या गटात दोन सामन्यातील दोन विजयांसह चार गुण झाले असून संघ अव्वल स्थानावर आहे. ऑस्ट्रेलिया एका विजयासह दोन गुण मिळवत दुसऱ्या स्थानावर आहे.रोहित शर्मासह भारताच्या सर्वच फलंदाजांनी आक्रमक फलंदाजी केली. याबद्दल बोलतानाच रोहित म्हणाला, "मी बऱ्याच दिवसांपासून बॅटने आक्रमक खेळण्याबद्दल बोलत आहे. सर्व गोष्टींचा विचार करता, आम्ही परिस्थितीशी जुळवून घेत खरोखरच चांगले खेळलो. इथे वाऱ्याचा थोडासा प्रभाव आहे, एकूणच आम्ही खूप हुशारीने खेळत आहोत. एकूणच आम्ही बॅट आणि बॉलसह चांगली कामगिरी केली."यासह टीम इंडियाच्या बॅटिंग ऑर्डरवर रोहित शर्मा म्हणाला, "आठही फलंदाजांना त्यांची भूमिका चोख पार पाडायची आहे, मग काहीही होवो. आम्ही पाहिले की एका खेळाडूने ५० धावा केल्या आणि आम्ही १९६ धावा केल्या. माझ्या मते तरी टी-२० मध्ये अर्धशतके आणि शतके झळकावण्याची गरज नाही, तुम्ही गोलंदाजांवर किती दबाव टाकता हे महत्त्वाचे आहे. सर्व फलंदाज सुरुवातीपासून असेच खेळत आले आहेत आणि आम्हालाही असंच खेळत राहायचं आहे. संघात खूप अनुभवी खेळाडू आहेत आणि संघ त्यांना पाठिंबा देतो."हार्दिक पंड्याबद्दल बोलताना रोहित शर्मा म्हणाला, "गेल्या सामन्यातही मी म्हणालो की, त्याच्या चांगल्या फलंदाजीने संघाला चांगल्या स्थितीत आणले आहे. टॉप५,६ फलंदाजांनंतर सामन्याला एक चांगला फिनिश देण्याची गरज आहे, हार्दिक हा हार्दिक आहे, आम्हाला माहित आहे की तो काय करण्यास सक्षम आहे. तो संघासाठी खूप महत्त्वाचा खेळाडू आहे, तो अशीच कामगिरी करत राहिल आणि संघाला एका चांगली धावसंख्या गाठण्यात मदत करेल."बांगलादेशचा ५० धावांनी पराभव करत सलग दुसऱ्या विजयासह उपांत्य फेरीतील आपला दावा मजबूत केला. या विजयासह भारताचे पहिल्या गटात दोन सामन्यातील दोन विजयांसह चार गुण झाले असून संघ अव्वल स्थानावर आहे. ऑस्ट्रेलिया एका विजयासह दोन गुण मिळवत दुसऱ्या स्थानावर आहे.रोहित शर्मासह भारताच्या सर्वच फलंदाजांनी आक्रमक फलंदाजी केली. याबद्दल बोलतानाच रोहित म्हणाला, "मी बऱ्याच दिवसांपासून बॅटने आक्रमक खेळण्याबद्दल बोलत आहे. सर्व गोष्टींचा विचार करता, आम्ही परिस्थितीशी जुळवून घेत खरोखरच चांगले खेळलो. इथे वाऱ्याचा थोडासा प्रभाव आहे, एकूणच आम्ही खूप हुशारीने खेळत आहोत. एकूणच आम्ही बॅट आणि बॉलसह चांगली कामगिरी केली."यासह टीम इंडियाच्या बॅटिंग ऑर्डरवर रोहित शर्मा म्हणाला, "आठही फलंदाजांना त्यांची भूमिका चोख पार पाडायची आहे.

### एक चांगला फिनिश देण्याची गरज

मग काहीही होवो. आम्ही पाहिले की एका खेळाडूने ५० धावा केल्या आणि आम्ही १९६ धावा केल्या. माझ्या मते तरी टी-२० मध्ये अर्धशतके आणि शतके झळकावण्याची गरज नाही, तुम्ही गोलंदाजांवर किती दबाव टाकता हे महत्त्वाचे आहे. सर्व फलंदाज सुरुवातीपासून असेच खेळत आले आहेत आणि आम्हालाही असंच खेळत राहायचं आहे. संघात खूप अनुभवी खेळाडू आहेत आणि संघ त्यांना पाठिंबा देतो."हार्दिक पंड्याबद्दल बोलताना रोहित शर्मा म्हणाला, "गेल्या सामन्यातही मी म्हणालो की, त्याच्या चांगल्या फलंदाजीने संघाला चांगल्या स्थितीत आणले आहे. टॉप५,६ फलंदाजांनंतर सामन्याला एक चांगला फिनिश देण्याची गरज आहे, हार्दिक हा हार्दिक आहे, आम्हाला माहित आहे की तो काय करण्यास सक्षम आहे.

# टूर्नामेंटचा 'किंग' ठरला विराट कोहली!

## विश्वचषकाच्या इतिहासात ही कामगिरी करणारा पहिला फलंदाज

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**टी-२० विश्वचषक २०२४ मधील सुपर८फेरीत भारत विरूद्ध बांगलादेश सामना खेळवला जात आहे. या सामन्यात बांगलादेश संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने २० षटकांत १९६ धावा केल्या. यादरम्यान विराट कोहलीच्या बॅटमधून शानदार खेळी पाहायला मिळाली. विराटने संघाला चांगली सुरुवात करून दिली आणि विश्वचषकाच्या (वनडे आणि टी-२०) इतिहासात एक अशी कामगिरी आपल्या नावे केली आहे, जे आजवर कोणताच खेळाडू करू शकलेला नाही.**



भारत वि बांगलादेश सामन्यात टीम इंडियाला १९६ धावांपर्यंत नेण्यात हार्दिक पंड्या आणि ऋषभ पंतचे सर्वात महत्त्वाचे योगदान होते. हार्दिक पांड्याने २७ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकार ५० धावांची नाबाद खेळी केली.तर ऋषभ पंतने २४ चेंडूत ४ चौकार आणि दोन षटकारांसह ३६ धावांचे योगदान दिले. त्याचवेळी शिवम दुबेनेही २४ चेंडूत ३ षटकारांच्या मदतीने ३४ धावा केल्या. कर्णधार रोहित शर्मानेही ११ चेंडूत ३ चौकार आणि एका षटकारासह झटपट २३ धावा करत संघाला चांगली सुरुवात करून दिली. बांगलादेशविरुद्धच्या या सामन्यात विराट कोहलीने २८ चेंडूत ३७ धावांची खेळी केली. यादरम्यान विराटने १ चौकार आणि ३ षटकार लगावले आहेत. या डावात विराटने आयसीसी विश्वचषक (वनडे + टी-२०) मध्ये मिळून ३ हजार धावाही पूर्ण केल्या. विराट कोहली आयसीसी विश्वचषक स्पर्धेत ३००० धावा करणारा जगातील पहिला फलंदाज ठरला आहे. याआधी एकाही फलंदाजाला हा टप्पा गाठता आला नव्हता.

### 28 चेंडूत 37 धावांची खेळी केली

टी-२० विश्वचषकात धावा काढण्यासाठी झगडत असलेल्या विराट कोहलीने एकाच मोठ्या खेळीत मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.भारत वि बांगलादेश सामन्यात टीम इंडियाला १९६ धावांपर्यंत नेण्यात हार्दिक पंड्या आणि ऋषभ पंतचे सर्वात महत्त्वाचे योगदान होते. हार्दिक पांड्याने २७ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकार ५० धावांची नाबाद खेळी केली.तर ऋषभ पंतने २४ चेंडूत ४ चौकार आणि दोन षटकारांसह ३६ धावांचे योगदान दिले. त्याचवेळी शिवम दुबेनेही २४ चेंडूत ३ षटकारांच्या मदतीने ३४ धावा केल्या. कर्णधार रोहित शर्मानेही ११ चेंडूत ३ चौकार आणि एका षटकारासह झटपट २३ धावा करत संघाला चांगली सुरुवात करून दिली.बांगलादेशविरुद्धच्या या सामन्यात विराट कोहलीने २८ चेंडूत ३७ धावांची खेळी केली.